15 JUL 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्यवृद्धीकडे कल ; तरुणाईस मिळतेय पाठबळ

## शिवाजी विद्यापीठात २५० स्टार्टअपची नोंद; १० नवसंकल्पनांना मान्यता

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**


शिवाजी विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राकडे आतापर्यंत २५० तरुण व नवसंशोधकांनी स्टार्टअपची प्राथमिक नोंदणी केली आहे. दहा उत्कृष्ट स्टार्टअप्सना मान्यता दिली असून त्यांना मार्गदर्शनाबरोबरच अनुदान उपलब्ध करून दिले जात आहे.


शिवाजी विद्यापीठात २०१८ रोजी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र स्थापन झाले. पश्चिम महाराष्ट्र स्टार्टअपचे हब होण्यासाठी प्रयत्न करण्याचा मानस केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी व्यक्त केला.



**जागतिक युवा कौशल्य दिन विशेष**

दीपक पवार हे सध्या उद्यमनगरमध्ये वेल्डर म्हणून काम करीत आहेत. त्यांनी स्टार्टअप अंतर्गत कणिक मळणी यंत्र तयार केले आहे. सध्या घरी, वसतिगृह, रेस्टॉरंटमध्ये गव्हाचे पीठ हाताने मळून गव्हाचे रोटे बनवले जातात. ही प्रक्रिया वेळखाऊ आहे. याचा विचार करूनच कणिक मळणी यंत्र तयार केले. पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे हे यंत्र विकसित करू शकलो. कमीत कमी ते जास्तीत जास्त कोणत्याही प्रमाणात पीठ मळून घेते. मेहनत आणि वेळ वाचते, असे पवार म्हणाले.









मुग्धा सावंत ही विद्यापीठाच्या टेक्नॉलॉजी विभागातील फूड सायन्सची विद्यार्थिनी आहे. तिने 'डिकॅफ : कॅफेईन फ्री कॉफी' पर्याय तयार केला आहे. डिकॅफ हा कॉफी सारखा समान चव देणारे उत्पादन आहे. कॉफी बीन्स न वापरता त्यामध्ये समान चव विकसित केली आहे. हा पदार्थ प्रोटीन व कॅल्शियम जास्त प्रमाणात देतो. जास्त प्रमाणात कॉफी घेतल्यामुळे होणारे दुष्परिणाम लक्षात घेता हे उत्पादन बनवले आहे. काही आजारासाठी कॅफेन असणारे पदार्थ टाळावे लागतात, अशा समस्यांसाठी हे उत्पादन तयार केले आहे. जे कमीत कमी किमतीत स्थानिक पातळीवर उपलब्ध आहे, असल्याचे मुग्धाने सांगितले.

पारंपरिक ऊस लागवड खूप कष्ट आणि वेळखाऊ प्रक्रिया आहे. ही गोष्ट विचारात घेऊन शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी संग्राम पाटील याने ऊस लागवड यंत्र तयार केले आहे. ऊस लागवड व तोड, मजुरीचा खर्च वाढत असून शेतकऱ्यांना मजूर वेळेवर मिळत नाहीत. हे रोटरी मेकॅनिझमवर काम केलेले ट्रॅक्टर चालविणारे मशिन आहे. हे ड्रम व रोटरी डिस्कद्वारे बांधले जाते. शेतकऱ्यांच्या गरजेनुसार दोन ओळी, दोन छडीमधील वेगळे अंतर समायोजित करण्यासाठी उपयोगी असल्याचे संग्राम यांनी सांगितले.

पैलवान थंडाईस अमृत म्हणतात. पारंपरिक थंडाई बनवण्याची प्रक्रिया कठीण, वेळखाऊ आहे. त्यामुळे लोक घरी थंडाई बनवण्याचे टाळतात. आज रेडी टू ड्रिंक कॅटेगरीत अनोखी थंडाई सुरू करण्याचा विचार कोणी केला नव्हता. हा विचार करून शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी धनंजय वडेरने 'बदाम थंडाई' तयार केली आहे. हे पेय हार्मोन्स संतुलित स्थितीत पुनर्संचयित करते. ते बद्धकोष्ठता नियंत्रित करते, पचनक्रिया सुधारते, असे वडेर म्हणाले.

अस्थमा व फुफ्फुसाच्या आजाराच्या रुग्णांना नियमितपणे नेब्युलायझरची आवश्यकता भासते. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान, स्वस्त दर व रुग्णांची गरज हे मुद्दे लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी दिग्विजय आजेरेकरने 'अल्ट्रा नेब्युलायझर' बनविले आहे. अल्ट्रा नेब्युलायझर विकसित केले असून नवीन जाळी तंत्रज्ञानाशी जुळवून घेते. मोबाईल फोन, पॉवर बँक, लॅपटॉप, कार चार्जर आदींसह ५ ते १२ व्ही मधील कोणत्याही यूएसबी पुरवठ्यासह वापरता येते. असे त्यांनी सांगितले.

15 JUL 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ : नवे अभ्यासक्रम सुरू

# बारावीनंतर 'अर्थशास्त्रा'चे शिक्षण घेता येणार

**संतोष मिठारी**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** समाजातील उद्योग, व्यापार, अर्थ आणि कला क्षेत्रांची गरज लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून चार नवे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. त्यात बारावीनंतर बी. एस्सी., एम. एस्सी., इकॉनॉमिक्स इंटिग्रेटेड फाईव्ह ईअर कोर्स आणि सुगम संगीत, शाहिरी, भजन पदविका अभ्यासक्रमाचा समावेश आहे.

विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाने शासकीय, कॉर्पोरेट क्षेत्राची मागणी, नव्याने सहभागी झालेल्या तांत्रिक बाबी लक्षात घेऊन पाच वर्षांचा नवा अभ्यासक्रम सुरू केला आहे. कला, वाणिज्य, विज्ञान (बारावी), डिप्लोमा इंजिनिअरिंग उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना ५५०० गुणांचे अर्थशास्त्र शिकविण्यात येणार आहे. फ्रेंच, जर्मन भाषेचा त्यात समावेश आहे. अभ्यासक्रम झाल्यानंतर इंडियन इकॉनॉमिक्स एक्झाम देता येते. बँका, केंद्रीय सांख्यिकी विभागात नोकरीची संधी मिळते. प्रवेश परीक्षा दि. ५ ऑगस्ट रोजी होणार आहे. सुगम संगीत, शाहिरी, भजनाची आवड असणाऱ्यांना त्याबाबतचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यासाठी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने पदविका अभ्यासक्रम सुरू केले आहेत. त्याचा कालावधी सहा महिने आहे. या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होईल, असे विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी सांगितले.

**आकडेवारी दृष्टिक्षेपात**

- विद्यापीठातील अधिविभाग : ३४
- संलग्नित महाविद्यालये : २७६
- अधिविभाग, महाविद्यालयांतील एकूण अभ्यासक्रमांची एकूण संख्या : २६२
- नव्या अभ्यासक्रमांची संख्या : ४



नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिवाजी विद्यापीठात सर्व विद्याशाखांचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणे आवश्यक आहे. विद्यापीठात अध्ययन, अध्यापन पदवी, पदव्युत्तर स्तरावर असणे गरजेचे आहे. त्याचा एक भाग म्हणून अर्थशास्त्रातील सर्व कौशल्य असणारा विद्यार्थी घडविण्यासाठी नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरु केला आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील लोकसंगीत, संस्कृती, कलांचे जतन करण्यासह त्याबाबतचा वारसा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी संगीत व नाट्यशास्त्र विभागात तीन नवे पदविका अभ्यासक्रमांची सुरुवात केली आहे.

-डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी कुलसचिव

# शिक्षणातील गुणवत्ता जोपासणारे

## न्यू कॉलेज

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिक्षणाचा दर्जा, शिस्त आणि सुसंस्कार अशा त्रिसूत्रीचा अवलंब करत शिक्षणातील गुणवत्ता जोपासणारे महाविद्यालय, अशी न्यू कॉलेजची ओळख आहे. कॉलेजमध्ये नियमित विद्याशाखेतील शिक्षणाबरोबरच पर्यावरण अभ्यास, व्यावसायिक अभ्यासक्रम, नवनवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम येथे उपलब्ध आहेत, तर महत्त्वाच्या शिष्यवृत्ती, कमवा शिका योजना, अशा उपक्रमांमुळे महाविद्यालयाने वेगळेपण जपले आहे. शिवाजी पेठ येथील श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचालित न्यू कॉलेजची स्थापना १९७१ रोजी झाली. शहराच्या मध्यभागी प्रशस्त इमारत, प्रयोगशाळांचा स्वतंत्र विभाग, समृद्ध ग्रंथालय, जिमखाना-व्यायामशाळेसाठी प्रशस्त हॉल, अशा सुविधांमुळे क्वॉलिटी कॉलेज असा नावलौकिक महाविद्यालयाने मिळवला आहे. म्हणूनच शिवाजी विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये नवीन 'नॅक' प्रक्रियेनुसार सर्वोच्च ग्रेड कॉलेजने प्राप्त केली आहे. महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान या विद्याशाखांबरोबरच बीबीए, बीसीए, बीसीएस, बीएस्सी, कॉम्प्युटर सायन्स असे व्यावसायिक अभ्यासक्रमही येथे शिकवले जातात. तसेच विविध वर्गासाठी पर्यावरण अभ्यास आणि शारीरिक शिक्षण हे विषय सक्तीचे करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. तसेच एम.ए, एम.कॉम, एम.एस्सी असे पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.फील, पीएच.डी., उच्च अभ्यासक्रमही महाविद्यालयात उपलब्ध आहेत. उच्च अभ्यासक्रमातील फिजिक्स, बॉटनी तसेच केमेस्ट्रीसाठी स्पेशल रिसर्च सेंटर येथे उपलब्ध आहे. यशवंतराव मुक्त विद्यापीठाचे केंद्रही महाविद्यालयात उपलब्ध आहे. यात नव्याने एमएस्सी फिजिक्स, मॅथ्स, एम.कॉम, एम.ए-पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन अभ्यासक्रम शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. तसेच शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रमही महाविद्यालयात उपलब्ध आहेत. यामध्ये ग्रंथालय व्यवस्थापन, मोडी लिपी, इव्हेंट मॅनेजमेंट, हिंदी अनुवाद, मुद्रितशोधन, पंचायती राज, सुगम संगीत यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतानाच नोकरीच्या संधी, तसेच रोजगारासाठी मार्गदर्शन-कार्यशाळांचे आयोजनही महाविद्यालयामार्फत केले जाते.



विद्यापीठाच्या पदवी परीक्षेतील गुणवत्ता यादीमध्ये सातत्याने स्थान प्राप्त करण्याबरोबरच निकालाची ९५ टक्क्यांपेक्षा जास्त टक्केवारीची परंपरा महाविद्यालयाने राखली आहे. म्हणूनच यूडीसीसी-आयआयटीसारख्या अभियांत्रिकी संस्थांमध्ये महाविद्यालयाचे शेकडो विद्यार्थी पोहोचले आहेत. **- प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील**

### विद्यार्थ्यांसाठी उत्तम सुविधा :

महाविद्यालयात शिक्षणाबरोबरच मुला-मुलींसाठी राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी), राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) या योजना सुरू असून सांस्कृतिक विभाग, विद्यार्थी कल्याण निधी-साहाय्य निधी, कमवा-शिका योजना, जिमखाना अशा उपक्रमांद्वारे चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.